# 8 मार्च

**आजचा सुविचार :**

**“भविष्याचा अंदाज घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तो तयार करणे.”**

**आजचे पंचांग :**

**वार – मंगळवार** **दिनांक : 8 मार्च 2022**

**मास - फाल्गुन** **नक्षत्र – कृतिका**

**सूर्योदय – सकाळी 6. 46 वाजता** **सायंकाळी 6. 41 वाजता**

**आजचे दिनविशेष :**

**आंतराष्ट्रीय महिला दिवस**

**1948 ला भारताची विमानसेवा एयर इंडिया इंटरनेशनल ची स्थापना करण्यात आली.**

**आजचे इंग्लिश शब्द : ( Fruits / फळे ) :**

**1) Pineapple - अननस** **2) Watermelon - कलिंगड**

**3) Lemon - लिंबू** **4) Jackfruit - फणस**

**आजची प्रश्नमंजुषा :**

**1) तुमच्या कुटुंबात किती सदस्य आहेत?**

**2) तुम्हाला माहित असणाऱ्या फुलांची नावे सांगा.**

**3) त्रिकोणाच्या तिन्ही कोनांची बेरीज किती असते?**

**4) ज्वलनासाठी कोणत्या वायूची आवश्यकता असते?**

आजची बोधकथा :

## ससा आणि लांडगा

एक लांडगा जंगलात खूप भुकेला होऊन हिंडत होता. त्याला शिकार मिळत नव्हती. फिरता फिरता एका झाडाच्या ढोलीत त्याला एक ससा बसलेला दिसला आणि लांडग्याला खूप आनंद झाला. लांडगा आपल्याच दिशेने येतो आहे हे पाहून सावध झालेला ससा ढोलीतून उडी मारून जोरात पळत सुटला. लांडगाही त्याच्यामागे धावू लागला. पण शेवटी ससा जोरजोरात पळत खूप पुढे निघून गेला.

लांडगा आधीच भुकेलेला आणि आता पळून पळून थकला होता. तो एका झाडाखाली विश्रांतीसाठी बसला. इतका वेळ ससा आणि लांडग्याची पळापळ झाडावर बसलेला एक कावळा पाहत होता. त्याने खवचटपणे लांडग्याला विचारले, “ काय हे, एवढासा ससा तुझ्या हातात सापडला नाही ? असं झाल तर तुझा धाक कसा राहील ?” त्यावर स्वतःची बाजू सावरत लबाड लांडगा म्हणाला, “ त्याला त्याच्या जीवाची भीती होती म्हणून तो जीवानिशी धावत होता. हे माझ्या लक्षात आल्यावर मी त्याला सोडून दिलं. दुसऱ्याच चांगल होण्यासाठी स्वतःचा थोडा तोटा झाला तरी तो सोसायला हवा.”

बोध : स्वार्थापेक्षा परमार्थ श्रेष्ठ.